# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./६६६६/२०२१ दि. १३/०८/२०२१

## परिपत्रक

विषय:- राष्ट्रीय सेवा योजना कक्षाकरीता मंत्रालयीन स्तरावर निर्माण केलेले राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद भरण्याबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र.युएनआय/८२/२१/विशि-१/७७६०, दि. ०९/०८/२०२१.

सर्व संबंधितांना याव्दारे कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजनेचे काम पाहण्यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार मंत्रालयात स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आलेला असून त्या कक्षाचे संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद केंद्र शासनाच्या निकषानुसार भरावयाचे आहे. सदर पद भरण्याबाबतची पात्रतेच्या अनुषंगाने संदर्भिय पत्र व त्यासोबत संलग्नित अटी आपल्या अवलोकनार्थ यासोबत संलग्न करण्यात येत आहे. नमुद अटी विचारात घेवून दि. ३१/०८/२०२१ पर्यंत गोंडवाना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पात्र उमेदवारांनी आपले अर्ज विद्यापीठाकडे आपल्या नियुक्ती प्राधिकाऱ्यामार्फत कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या नावाने सादर करावयाचे आहे. तसेच सदर अर्जासोबत आपले मागील ५ वर्षाचे गोपनिय अहवाल, सक्षम प्राधिकाऱ्यांचे प्रतिवेदन व पुर्नेविलोकन केलेले अर्जासोबत जाडावयाचे आहे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**संलग्न:-** संदर्भिय पत्राची प्रत व पात्रतेच्या अटींची प्रत.

मा. कुलसचिव यांच्या आदेशान्वये,

(डॉ. विजय सिलारे)
उपकुलसचिव,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर:-**

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरुंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-००१
४. मा. कुलसचिवांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
५. मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर.
६. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर.
७. मा. सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सदरहू परिपत्रक आपल्या अधिनस्त शिक्षकांच्या निदर्शनास आणून देण्याकरीता सविनय सादर.
८. गोंडवाना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व संबंधितांकरीता सादर.
९. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

(डॉ. विजय सिलारे)
उपकुलसचिव,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
www.dhepune.gov.in E-mail- vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६१२४६३९,२६०५१५१२ फॅक्स ०२०/२६१११११५३
क्रमांक-युएनआय/(८२/२१)/विशि-१ / 6660 दिनांक- - 9 AUG 2021

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

**विषय- राष्ट्रीय सेवा योजन कक्षाकरिता मंत्रालयीन स्तरावर निर्माण केलेले राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद भरण्याबाबत.**

संदर्भ- १. शासनाचे क्रमांक इएसटी-४४१५/प्र.क्र.३७७/आस्था-१
दिनांक ७ जानेवारी, २०२१

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भिय पत्राची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकनी घ्यावी.

वरील संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजनेचे काम पाहण्यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार मंत्रालयात स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आलेला आहे. या कक्षाचे संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद केंद्र शासनाच्या निकषानुसार भरावयाचे आहे. सदर पदाची पात्रता खालीलप्रमाणे केंद्र शासनाने निर्धारित केलेली आहे.

1. He/ She should have served as programme Co-ordinator in the University or Programme Officer in a college at least for four years continuously.
2. He/ She should possess the academic qualifications for being appointed as programme Co-ordinator as prescribed by the Ministry of Youth Affairs and sports, Government of India.
3. He/ She should have interest in Youth work in particular and social work in general.

तसेच इतर अटी खालीलप्रमाणे आहेत.

१ संपर्क अधिकारी हे पद सहयोगी प्राध्यापक (Associate Professor) (सुधारित वेतनश्रेणी रुपये १३१४००-२१७१००) या संवर्गातील राहील.

२. त्यांचे मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषेवर प्रभुत्व असावे.

३. पात्र उमेदवारांची प्रतिनियुक्तीने वा कंत्राटी पध्दतीने प्रथमत: एक वर्षासाठी नियुक्ती करण्यात येईल आणि त्यानंतर त्या व्यक्तिचा कामाचा आढावा घेऊन मुदतवाढ देता येईल.

४. पात्र उमेदवाराची नियुक्ती मंत्रालयीन आस्थापनेवर असेपर्यंत त्याला शिक्षण विभागाच्या दीर्घ मुदतीचे रजेचे नियम लागू न होता सर्वसाधारण शासकीय कर्मचा-यांचे रजेचे नियम लागू होतील.

५. पात्र उमेदवारांची नियुक्ती प्रतिनियुक्ती पध्दतीने जरी होत असली तरीही त्याची सेवा स्वीयेत्तर (Foreign Services) समजली जाणार नाही. आणि म्हणून त्या व्यक्तिला कोणत्याही प्रकारचा प्रतिनियुक्ती भत्ता (Deputation Allowances) अनुज्ञेय राहणार नाही. फक्त वर दिलेल्या वेतनश्रेणीत महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार त्यांचे वेतन नियमित केले जाईल.

६. पात्र उमेदवाराला राष्ट्रीय सेवा योजनेसंबंधी सर्व प्रकारची प्रशासकीय कामे, विद्यापीठांना वेळेवर अनुदान मंजूर करणे, मंजूर केलेल्या अनुदानाचे लेखा परीक्षण करणे आणि केंद्र शासन विभागीय केंद्र पुणे आणि राज्यातील सर्व विद्यापीठांशी योग्य समन्वय साधावा लागेल. तसेच राज्यातील प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीचा पदसिध्द सदस्य म्हणून प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीच्या बैटकीस उपस्थित रहावे लागेल व वेळोवेळी निर्देशित केलेली कामे पार पाडावी लागतील.

७. पात्र उमेदवार मुंबई बाहेरील असल्यास त्याला स्वत:ला त्याच्या निवासस्थानाची व्यवस्था करावी लागेल. त्याची जबाबदारी शासनावर राहणार नाही.

वरील अटी विचारात घेऊन राज्यातील पात्र उमेदवारांनी आपले अर्ज आपल्या कार्यक्षेत्रातील संबंधित अकृषि विद्यापीठांकडे आपल्या नियुक्ती प्राधिका-यामार्फत **दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१ पर्यंत** सादर करावेत अशा प्रकारची जाहिरात मा.सहाय्यक संचालक(जाहिरात), माहिती व जनसंपर्क संचालनालय मुंबई यांना दिनांक ०९ ऑगस्ट, २०२१ रोजी दिलेली आहे. त्याप्रमाणे संचालनालयाने दिलेल्या जाहिरातीचा मसुदा आपण आपल्या विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावा. तसेच जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे पात्र उमेदवारांनी आपणाकडे सादर केलेले अर्ज व आवश्यक ती संपुर्ण कागदपत्रे ही सोबतच्या तक्त्यात नमूद करुन या संचालनालयास दिनांक १५ सप्टेंबर, २०२१ पर्यंत या संचालनालयास पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. जर आपल्या विद्यापीठाकडे अर्ज प्राप्त झाले नाही तर निरंक अहवाल पाठविण्यात यावा.

**तसेच अर्जासोबत संबंधित उमेदवारांचे गोपनीय अहवाल, सक्षम प्राधिका-यांनी प्रतिवेदन व पुर्नविलोकन केलेले जोडणे आवश्यक आहे.**

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

प्रत- मा.श्री.द.रा.कहार, सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२ यांना माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय(उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१

राष्ट्रीय सेवायोजन कक्षाकरिता मंत्रालयीन स्तरावर निर्माण केलेले राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद भरण्याबाबत.

---

राष्ट्रीय सेवा योजनेचे काम पाहण्यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार मंत्रालयात स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आलेला आहे. या कक्षाचे संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद केंद्र शासनाच्या निकषानुसार भरावयाचे आहे. सदर पदाची पात्रता खालीलप्रमाणे केंद्र शासनाने निर्धारित केलेली आहे.

1. He/ She should have served as programme Co-ordinator in the University or Programme Officer in a college at least for four years continuously.
2. He/ She should possess the academic qualifications for being appointed as programme Co-ordinator as prescribed by the Ministry of Youth Affairs and sports, Government of India.
3. He/ She should have interest in Youth work in particular and social work in general.

तसेच इतर अटी खालीलप्रमाणे आहेत.

१. संपर्क अधिकारी हे पद सहयोगी प्राध्यापक(Associate Professor) (सुधारित वेतनश्रेणी रुपये १३१४००-२१७१००) या संवर्गातील राहील.

२. त्यांचे मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषेवर प्रभुत्व असावे.

३. पात्र उमेदवारांची प्रतिनियुक्तीने वा कंत्राटी पध्दतीने प्रथमत: एक वर्षासाठी नियुक्ती करण्यात येईल आणि त्यानंतर त्या व्यक्तीचा कामाचा आढावा घेऊन मुदतवाढ देता येईल.

४. पात्र उमेदवाराची नियुक्ती मंत्रालयीन आस्थापनेवर असेपर्यंत त्याला शिक्षण विभागाच्या दीर्घ मुदतीचे रजेचे नियम लागू न होता सर्वसाधारण शासकीय कर्मचा-यांचे रजेचे नियम लागू होतील.

५. पात्र उमेदवारांची नियुक्ती प्रतिनियुक्ती पध्दतीने जरी होत असली तरीही त्याची सेवा स्वीयेत्तर (Foreign Services) समजली जाणार नाही. आणि म्हणून त्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारचा

प्रतिनियुक्ती भत्ता (Deputation Allowances) अनुज्ञेय राहणार नाही. फक्त वर दिलेल्या वेतनश्रेणीत महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार त्यांचे वेतन नियमित केले जाईल.

६. पात्र उमेदवाराला राष्ट्रीय सेवा योजनेसंबंधी सर्व प्रकारची प्रशासकीय कामे, विद्यापीठांना वेळेवर अनुदान मंजूर करणे, मंजूर केलेल्या अनुदानाचे लेखा परीक्षण करणे आणि केंद्र शासन विभागीय केंद्र पुणे आणि राज्यातील सर्व विद्यापीठांशी योग्य समन्वय साधावा लागेल. तसेच राज्यातील प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीचा पदसिध्द सदस्य म्हणून प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीच्या बैठकीस उपस्थित रहावे लागेल व वेळोवेळी निर्देशित केलेली कामे पार पाडावी लागतील.

७. पात्र उमेदवार मुंबई बाहेरील असल्यास त्याला स्वतःला त्याच्या निवासस्थानाची व्यवस्था करावी लागेल. त्याची जबाबदारी शासनावर राहणार नाही.

वरील अटी विचारात घेऊन राज्यातील पात्र उमेदवारांनी **दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१ पर्यंत** आपले अर्ज आपल्या कार्यक्षेत्रातील संबंधित अकृषि विद्यापीठाकडे आपल्या नियुक्ती प्राधिका-यामार्फत सादर करावेत. तसेच सदर अर्जासोबत आपले मागील ५ वर्षाचे गोपनीय अहवाल, सक्षम प्राधिका-यांनी प्रतिवेदन व पुर्नविलोकन केलेले अर्जासोबत जोडण्यात यावेत.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.